**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 24/09/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत धनश्री राईसमिलच्या बाजुला मारोडी ता. मौदा येथे 14/9/2021 चे 15.00 वा. ते 16/09/2021 चे 10.30 वा. सुमारास मारोडी शिवारातील धनश्री राईस मिल च्या बाजुला लागलेल्या टॉवरचा अमर राजा कंपनीच्या 24 बॅटऱ्यापैकी 22 बॅटऱ्या कि. 22,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पवन सुधाकरजी मोरे, वय 35 वर्ष, रा. सडकअर्जुनी जि. गोंदिया यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम मो क्र. 99822545169 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील मौजा पंचधार येथे 22/9/2021 चे 23.00 वा. ते 23/09/2021 चे 02.00 वा. फिर्यादी नामे– हरीदासजी नामदेवराव बाहेकर, वय 65 वर्षे, रा. पंचधार ता.काटोल जि.नागपूर याचे पांढ्या रंगाचा गोरा कि. 10,000/–रू. तसेच गावातील कौशल्याबाई हिचे लाल रंगाची कालवड अंदाजे कि. 5,000/–रू. असा एकुण 15,000/–रू. चे जनावर अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 379, 427 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भोजराज तांदुळकर मो क्र. 99822545169 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील मौजा केसरीमल पालीवाल विद्यालय समोरील साई मंदीर जवळ येथे 22/09/2021 चे 08.00 वा. ते 10.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– विद्यानंद हेमराज नारनवरे वय 18 वर्ष, रा. चिंचभवन ता.पारशिवनी यांनी आपली एम.एच–40/ए.डबलु– 4388 क्रमांकाची होंडा सी.डी. 110 ड्रिम कंपनीचा मोटरसायकल ही केसरीमल पालीवाल विद्यालयाच्या समोरील साई मंदिराच्या समोर उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादची कि. 30,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नरेश रामटेके मो.क्र. 9890100715 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर